




दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४ | अंक ३५२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजपचे किती मंत्री घेणार शपथ?

## भाजप सर्वात मोठा पक्ष

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपच्या 132 जागा, शिवसेनेच्या 57 जागा तर राष्ट्रवादीच्या 41 जागा निवडून आल्या आहेत. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरल्याने भाजपचे जास्त मंत्री असतील. त्यानंतर शिंदेची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे मंत्री असतील. मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्री असतील अशीही शक्यता आहे.



## कोण-कोण होणार मंत्री?

शिवसेनेकडून एकनाथ शिंदे, उदय सामंत, तानाजी सावंत, दीपक केसरकर, शंभुराज देसाई हे मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचं कळतं आहे. तर राष्ट्रवादीकडून अजित पवार, अदिती तटकरे, अनिल पाटील, धनंजय मुंडे आणि दिलीप वळसे पाटील शपथ घेणार आहेत. मात्र मुख्यमंत्री कोण होणार याचा सस्पेंस अजूनही कायम आहे. पहिल्या टप्प्यात असे एकूण 20 मंत्री शपथ घेणार आहेत.

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता शपथविधीची तयारी सुरु झाल्याची माहिती समोर येते आहे. मंगळवारी महायुतीचा शपथविधी होणार असल्याची माहिती समोर येत आहे. या मंत्रिमंडळात एकूण 20 मंत्री शपथ घेणार असल्याचं बोललं जात आहे. शिवसेनेच्या मंत्रिपदाच्या नावावर शिक्कामोर्तब झाला आहे. पहिल्या टप्प्यात शिवसेनेचे 5 मंत्री शपथ घेणार आहेत आणि राष्ट्रवादीचे ही पाच मंत्री शपथ घेणार आहेत. तर भाजपचे 10 मंत्री शपथ घेणार आहेत. दोन्ही पक्षाने संभाव्य आमदारांची नावे दिल्लीत पाठवली होती. ज्यावर शिक्कामोर्तब झाल्याचे कळते आहे. मुख्यमंत्री कोण होणार?राज्यात महायुतीला 230 जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे बहुमताच्या जोरावर उद्या नवीन सरकारचा शपथविधी होणार आहे. आज रात्री महायुतीतील तिन्ही पक्षाचे मोठे नेते दिल्लीत येऊ शकतात. उद्या शपथविधीवर यामध्ये महत्त्वाचा निर्णय होऊ शकतो. मुख्यमंत्री कोण होणार याबाबत ही शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदाच्या बाबतीत सर्वात प्रबळ दावेदार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात जरी महायुतीने निवडणूक लढवली असली तरी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सर्व सूत्र होती. देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत आपल्या रणनीतीने भाजप आणि महायुतीचे रेकॉर्ड ब्रेक असे उमेदवार निवडून आणले आहेत. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी युती तोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी सोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने फडणवीस हे मुख्यमंत्री होऊ शकले नव्हते. पण पुन्हा एकदा त्यांना जनतेने जनाधार दिल्याने ते या शर्यतीत आघाडीवर आहेत.

## ट्रम्पेटनं डाव साधला, शरद पवारांच्या पक्षाला तब्बल ९ जागांवर फटका

। प्रतिनिधी राज्यात विधानसभा निवडणुकीत (२०२४) महायुतीला () मोठे बहुमत मिळाले. निकालानंतर आता महायुतीमध्ये सत्तास्थापनेसाठी हालचाली वाढल्या आहेत. मुख्यमंत्रिपद कोणाकडे द्यावे, याबाबत महायुतीतील मित्रपत्रांमध्ये चर्चा चालू आहे. तर दुसरीकडे राज्यातील जनतेने महाविकास आघाडीकडे पाठ फिरवलीआहे. शरद पवार , उद्धव ठाकरे ( ) तसेच काँग्रेसला जनतेने नाकारले आहे. दरम्यान, या निवडणुकीतील निकालाचे विश्लेषण केले जात असताना अचंबित करणाऱ्या बाबी समोर येत आहेत. ताज्या अभ्यासानुसार तुतारी (ट्रम्पेट) या निवडणूक चिन्हामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला जवळपास ९ जागांवर फटका बसला आहे. आकडेवारी काय सांगते? विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह तुतारी फुंकणारा माणूस असे होते. याच निवडणुकीत अनेक जागांवर तुतारी (ट्रम्पेट) असे चिन्ह असलेले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. तुतारी या नावामुळे अनेक जागांवर शरद पवार यांच्या पक्षाला फटका बसू शकतो, असा अंदाज व्यक्तक केला जात होता. त्याची प्रचीती आता आली आहे. शरद पवार यांच्या पक्षाला या निवडणुकीत एकूण नऊ जागांवर फटका बसला आहे. तुतारीला मिळणारी मतं जर शरद पवार यांच्या पक्षाला मिळाली असती तर या नऊ जागांवर राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार विजयी झाले असते, असे बोलले जात आहे. कोणकोणत्या जागांवर फटका बसला? जिंतूर, घनसावंगी, शहापूर, बेलापूर, अणुशक्तीनगर, आंबेगाव, पारनेर, केज, परंडा या जागांवर शरद पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा जेवढ्या मतांनी पराभव झाला आहे, त्यापेक्षा अधिक मतं तुतारी हे निवडणूक चिन्ह असलेल्या उमेदवारा मिळाली आहेत. मतांचा फरक काय? जालना जिल्ह्यात शरद पवार यांच्या पक्षाचे विजय भांबळे यांचा पराभव झाला. या मतदारसंघात त्यांचा ४५१६ मते कमी पडली. तर तुतारी म्हणजेच ट्रम्पेटला ७४३० मतं मिळाली. घनसावंगीमध्ये राजेश टोपे यांचा २३०९ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेट या चिन्हाला ४८३० मते मिळाली. शहापूर येथे शरद पवार यांच्या पक्षाचे पांडुरंग बरोरा यांचा १६७२ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेटला ३८९२ मते मिळाली. बेलापूरमध्ये शरद पवार यांच्या पक्षाचे संदीप नाईख यांचा अवघ्या ३७७ मतांनी पराभव झाला. तर येथे ट्रम्पेटला २८६० मते मिळाली. अणुशक्तीनगर येथे फहाद अहमद यांचा ३३७८ मतांनी पराभव झाला.

## आ.सुरेश धस यांच्या विरोधात अश्लिल पोस्ट

### धस समर्थक आष्टी पोलीस ठाण्यात; कारवाई करण्याची मागणी




बीड : आष्टी मतदारसंघात मोठे मताधिक्य घेवून आ.सुरेश धस यांनी विजयी झाल्यानंतर विजयीसभेतून पंकजा मुंडे यांच्यावर तोफ डागली. यानंतर बीड जिल्ह्यात खळबळ माजली असून मुंडे व धस समर्थक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करू लागले आहेत. यातूनच काही व्हिडिओ व्हायरल झाले असून व्हिडिओंच्या माध्यमातून धसांवर गैरभाष्य करत पुतळ्याचे दहन करण्यात आले आहे. याच अनुषंगाने धस समर्थकांनी पोलीस ठाण्यात जावून कारवाई करण्याची मागणी केली

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांचा ना.धनंजय मुंडे, डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून सत्कार



**बीड (प्रतिनिधी)**

दि.२४ : नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती सरकार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या यशाबद्दल पक्षाच्या प्रमुख नेत्यांचा राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबईतील देवगिरी निवासस्थानी भेटून सत्कार केला.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते आ.छगनराव भुजबळ यांची मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी ना.धनंजय मुंडे यांच्यासमवेत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट घेतली. यावेळी विधानसभा निवडणुकीत महायुती सरकार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या यशाबद्दल अजितदादांसह प्रमुख नेत्यांचा सत्कार केला. तसेच, परळी विधानसभेतील ऐतिहासिक विजयाबद्दल ना.धनंजय मुंडे यांचे देखील नेत्यांनी कौतुक करून अभिनंदन केले. यावेळी राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे हे देखील उपस्थित होते.

### संधी दिल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले पक्षश्रेष्ठींचे आभार

बीड विधानसभा निवडणुकीत महायुतीचा उमेदवार म्हणून संधी दिल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सर्व पक्षश्रेष्ठींचे आभार मानले. या निवडणुकीत सर्व प्रमुख नेत्यांचे मार्गदर्शन, सहकार्य लाभले असल्याचे त्यांनी सांगितले.

## पिंपरी चिंचवडचे भाजप आमदार शंकर जगताप यांचा सत्कार



प्रतिनिधीं बीडपुण्यातील चिंचवड विधानसभा मतदार संघातून विजयी झालेले भाजपचे नवनियुक्त आमदार शंकर जगताप यांचा विशाल नगर येथे रविवारी सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप नेते सचिन साठे, भारतीय खाद्य निगमचे सदस्य अनिल संचेती, सतीश गायकवाड, प्रभाकर न्यालकंटी , सचिन पवार, बाबुलाल बधाई , रोशन तातेड , संजय लबरू आदी उपस्थीत होते.

## राजेभाऊ फड एका विजयाने कोणी मोठा होत नाही आणि एका पराभवाने कोणीही संपत नाही

### पक्षाचे काम जोमाने करणार; पवार साहेबांचा विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोचवणार - राजेभाऊ फड

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ताकद वाढवण्यासाठी जोमाने काम करणार असून देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी ज्येष्ठांना आणि युवकांना सोबत घेऊन नव्याने संघटना वाढीसाठी रचनात्मक काम करण्यावर आम्ही भर देणार असल्याचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. पक्षाच्या बाजूने लढणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांसोबत हातात हात घालून काम करू तसेच पक्षाला कौल देणाऱ्या मतदारांच्या समस्या सोडवण्यासाठी संघर्ष करीत राहणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.



परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघ हा राज्यातील सर्वाधिक लक्षवेधी असलेला मतदारसंघ आहे. येथील जनता शरदचंद्र पवार साहेबांच्या नेहमीच पाठीशी उभी टाकलेली आहे आणि त्यांच्या विचारांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. एका विजयाने कोणी मोठा होत नाही आणि एका पराभवाने कोणीही संपत नाही. विधानसभा निवडणुकीतील निकाल हा जरी धक्कादायक असला तरीही या निकालाचे अजिबात आश्चर्य नाही. लोकशाहीला काळीमा फासणाऱ्या अनेक घटना मतदानाच्या दिवशी घडल्या. बोगसगिरीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडले आहेत. त्यामुळे हा जनतेचा कौल आहे असं कसं म्हणता येईल? हा तर फक्त ईव्हीएम चा कौल आहे. पक्षाचे अध्यक्ष आणि देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात आम्ही वाटचाल करणार असून नव्या जोमाने आम्ही काम करू, पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी रचनात्मक आखणी करू आणि ज्येष्ठांना व युवकांना सोबत घेऊन पक्षाचा विस्तार करू अशी प्रतिक्रिया युवक नेते राजेभाऊ फड यांनी माध्यमांना दिली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाचे आकर्षण

अमेरिकेत शिकणाऱ्या एकूण परदेशी विद्यार्थ्यांत भारतीय विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. कॅनडा, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, जर्मनी या देशांतही भारतीय विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. देशात उच्च शिक्षणाच्या सुविधा वाढत असतानाही भारतीय विद्यार्थी परदेशी का जात आहेत, यावर टाकलेला दृष्टिक्षेप. अमेरिकेत सध्या ११ लाख परदेशी विद्यार्थी असून, त्यांमध्ये सर्वांत जास्त म्हणजे ३.३१ लाख म्हणजे २९.४ टक्के विद्यार्थी भारताचे असल्याचे मओपन डोअर्स २०२४फ च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. तिथे जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या वर्षागणिक वाढत आहे. २००९ मध्ये तिथे जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या सुमारे एक लाख होती. आता त्यात तिपटीने वाढ झाली आहे. याच कालावधीत तेथील चिनी विद्यार्थ्यांचे प्रमाण दुपटीने (१.२७ लाखांवरून २.७७ लाख) वाढले; परंतु गेल्या काही वर्षांत त्यांची संख्या घटते आहे. दक्षिण कोरिया (४३१४९), कॅनडा (२८९९८), तैवान (२३१५७) येथील विद्यार्थ्यांची संख्याही अमेरिकेत उल्लेखनीय आहे. अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४३ टक्के विद्यार्थी गणित आणि संगणकशास्त्र शिकतात. अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण २४.३ टक्के आहे; परंतु हे प्रमाण गेल्या काही वर्षांपासून कमी होत आहे. बहुतेक भारतीय विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी (पीजी) अमेरिकेत जातात. तेथील एकूण भारतीय विद्यार्थ्यांत मपीजीफ च्या विद्यार्थ्यांची संख्या १.९६ लाख (५९ टक्के) असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यांच्या संख्येत १८ टक्के वाढ झाली आहे. पदवी शिक्षणासाठीही (यूजी) तिथे जाण्याचा कल वाढत असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यांमध्ये १३ टक्के वाढ झाली आहे. या दोन्ही गटांतील चिनी विद्यार्थ्यांची संख्या मात्र घटत आहे. केंद्र सरकारने दिलेल्या माहितीनुसार, २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात सुमारे तेरा लाख भारतीय विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी गेले. त्यांपैकी सर्वाधिक म्हणजे ४.२७ लाख विद्यार्थी कॅनडात गेले. अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या (३.३१ लाख) या क्रमवारीत दुसऱ्या स्थानी आहे. ब्रिटनमध्ये १.८५ लाख, ऑस्ट्रेलियात १.२२ लाख आणि जर्मनीत ४९ हजार विद्यार्थी शिक्षणासाठी गेले. भारतीय विद्यार्थी विदेशातील शिक्षणासाठी सुमारे तीस अब्ज डॉलर खर्च करतात, असा अंदाज आहे. परदेशी जाऊ इच्छिणाऱ्यांची वाढती संख्या पाहता, येत्या एक-दोन वर्षांत ही रक्कम ७० अब्ज डॉलरवर जाईल, असे अनुमान आहे. गेल्या दोन दशकांतउच्च शिक्षण घेणारे वाढले आहेत. वीस वर्षांपूर्वी देशात २३६ विद्यापीठे होती; सन २०२१-२२मध्ये विद्यापीठांची संख्या ११६८ होती. २००० मध्ये बारा हजारांच्या घरात असलेल्या महाविद्यालयांची संख्या आता ४५ हजारांवर पोहोचली आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्यांची देशातील संख्या २००१मध्ये सुमारे ८० लाखांवरून आता ४.३३ कोटींवर गेली आहे. दोन दशकांत उच्च शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येतही पाचपटीने वाढ झाली. १८ ते २३ या वयोगटातील उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण या काळात आठ टक्क्यांवरून २८.४ टक्क्यांवर गेले आहे. आपल्याकडे संख्यात्मक वाढ झाली असली, तरी गुणात्मक वाढ कमी आहे. आंतरराष्ट्रीय मक्यूएसफ क्रमवारीत भारतीय विद्यापीठे खूप मागे आहेत. सरकारी विद्यापीठांत सुविधांपासून शिक्षकांपर्यंत कमतरता आहे. आपल्याकडील विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांत फारशी देवाण घेवाण नाही. परदेशांत ती असते. त्यामुळे तिथे संशोधनाला वाव मिळतो. परदेशातील शिक्षणानंतर तिथेच जॉब मिळण्याच्या (आणि नंतर तिथेच स्थायिक होण्याच्या संधी वाढतात. यामुळे क्रयशक्ती असणारा पालकवर्ग आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवू लागला आहे.

# तेव्हा कसोटी खेळणाऱ्याला प्रतिदिन ५० रु. मिळत आठवणी एका ज्येष्ठ कसोटीपटूच्या

चंदू पाटणकर हे १९५५ साली भारताचे यष्टिरक्षक म्हणून कलकत्त्याच्या ईडन गार्डन स्टेडियमवर न्यूझीलंड विरुद्धचा चौथा कसोटी सामना खेळले होते, त्या वेळी त्यांनी न्यूझीलंडच्या गॉर्डन लेगाट आणि बर्ट सटक्लिफ् या दोन्ही सलामीच्या फलंदाजांचे झेल यष्टीमागे लीलया पकडून त्यांना बाद केले होते. तसेच टोनी मॅकगिबन् या मातब्बर फलंदाजाला यष्टिचीत केले होते. त्याच सामन्यात ते भारतातर्फे आठव्या क्रमांकावर फलंदाजी करायला मैदानात उतरले होते तेव्हा भारताची धावसंख्या ७ बाद ८८ इतकी शोचनीय होती. अश्याही परिस्थितीत चंदू पाटणकर यांनी जे. एम. घोरपडे यांना उत्तम साथ देत अर्धशतकाची भागीदारी केली आणि स्वतः १३ धावा काढल्या. दुसऱ्या डावात फलंदाजी करत असताना त्यांनी अवघी एकच धाव काढलेली असताना भारताने डाव घोषित केल्याने ते नाबाद राहिले. दुसऱ्या डावात यष्टिरक्षक म्हणून खेळत असताना त्यांनी न्यूझीलंडचा फलंदाज जॅक अलबस्टर याचा यष्टीमागे झेल घेतला. एकंदरीत त्यांची कामगिरी समाधानकारकच झाली. मात्र तरीही चंदू पाटणकर यांच्या नावाचा विचार कसोटी सामन्यांसाठी पुढे कधी केला गेलाच नाही. नरेन ताह्मणे आणि नाना जोशी यांनाच भारताचे यष्टिरक्षक म्हणून पुढे अनेक वर्षे संधी मिळत गेली आणि चंदू पाटणकर यांची कसोटी कारकीर्द, कलकत्यातल्या त्या एकमेव कसोटी सामन्यानंतर समाप्तच झाली. प्रथम दर्जाच्या २६ सामन्यात त्यांनी ३८ फलंदाजांना यष्टीमागे क्षेत्ररक्षण करताना बाद केले होते आणि स्वतः फलंदाजी करत असताना पाचशेहून अधिक धावा रचल्या होत्या. चंदू पाटणकर यांची दृष्टी आणि स्मृती याही वयात उत्तम आहे. ते आजही दूरदर्शनवर क्रिकेटचे सामने पाहत असतात. क्रिकेटविषयक मराठी - इंग्रजी पुस्तके वाचत असतात. मी २००४ साली भारत - पाकिस्तान एकदिवसीय क्रिकेट सामने पाहण्यासाठी पाकिस्तानला गेलो होतो. त्यासंदर्भातील माझे पुस्तक दोनदा वाचल्याचे त्यांनी सांगितले. क्रिकेटपटू संदीप पाटील याने त्यांना भेट दिलेल्या ङ्गबियॉण्ड द बाउंडरीज्फ या आत्मचरित्राची प्रत त्यांनी आम्हाला दाखवली. त्यांनी त्यांचे एक विशेष आवडते पेन मला दिले. हे पेन सुनील गावस्कर यांनी त्यांना सप्रेम भेट दिले होते. गप्पांच्या ओघात भारताच्या पहिल्या पाकिस्तान दौऱ्याचा विषय निघाला. हा दौरा डिसेंबर १९५४ ते मार्च १९५५ या दरम्यानचा होता. त्या दौऱ्यासाठी यष्टिरक्षक म्हणून भारतीय संघात आपली निवड होईल असा बहुधा त्यांचा कयास होता. परंतु भारताच्या संघात यष्टिरक्षक म्हणून नरेन्द्र ताम्हणे यांची प्रथमच निवड झाली. आपली ती संधी हुकली याची सल चंदू पाटणकर यांना आजही वाटत असल्यास नवल वाटायला नको. मात्र नरेन्द्र ताम्हणे यांच्याबद्दल त्यांच्या मनात तिळमात्र असूया किंवा मत्सर नाही. उलट अमाप जिव्हाळाच आहे. पाकिस्तानच्या त्या दौऱ्यात लाहोर, पेशावर किंवा बहावलपूर यांपैकी कुठल्यातरी एका शहरात भारतीय संघाच्या सगळ्या खेळाडूंना एकाच ठिकाणी एकत्रितपणे राहणे शक्य होईल असे एकही दर्जेदार हॉटेल नसल्याने त्यांची राहण्याची सोय चक्क तिथल्या रेल्वेस्थानकातल्या लोहमार्गावर रेल्वेचे दोन खास डबे एकाच जागी उभे करून त्यांमध्ये करण्यात आली होती, असेही त्यांनी सांगितले. त्याकाळी पाच दिवसांच्या कसोटी सामन्यात संघातल्या प्रत्येक खेळाडूला प्रतिदिनी ५० रुपये दिले जात असत. सामना चारच दिवसांत संपला तर पाचव्या दिवसाचे पैसे मिळत नसत. १९५५ साली ते जो एकमेव एक कसोटी सामना खेळले, तेव्हा पॉली उम्रीगर हे त्या संघाचे कर्णधार होते. विनू मंकड आणि नरी कॉन्ट्रॅक्टर हे सलामीचे फलंदाज होते. पंकज रॉय तिसऱ्या क्रमांकाचे फलंदाज होते. विजय मांजरेकर, पॉली उम्रीगर, गुलाबराय रामचंद आणि जयसिंगराव घोरपडे हे मधल्या फळीचे फलंदाज होते तर दत्तू फडकर आणि जी. सुंदरम् हे द्रुतगती गोलंदाज म्हणून आणि सुभाष गुप्ते हे फिरकी गोलंदाजीचे जादूगार म्हणून या संघात होते. अशा संघात यष्टिरक्षक म्हणून खेळण्याची संधी चंदू पाटणकर यांना मिळाली होती. असो. चंदू पाटणकर यांचा जन्म पेण येथे २४ नोव्हेंबर १९३० रोजी झाला होता. त्यांचे वडील डॉक्टर होते. वैद्यकीय व्यवसायासाठी ते पुण्याला आले. त्यांनी डेक्कन जिमखान्यालगतच्या पी. वाय. सी. हिंदू जिमखान्यासमोरच घर घेतले आणि तिथेच आपला दवाखाना सुरू केला. साहजिकच त्याच भागात राहत असलेले क्रिकेट महर्षी प्रा. दि. ब. देवधर यांचे त्या दवाखान्यात अधूनमधून येणे - जाणे होऊ लागले आणि चंदू पाटणकर यांचे वडील हे प्रा. देवधर यांचे मित्र आणि फॅमिली डॉक्टर झाले. प्रा. देवधर हे एस. पी. कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. कॉलेज संपल्यावर संध्याकाळच्या वेळी ते धोतर नेसून मात्र पायांना पॅड बांधून जिमखान्याच्या मैदानावर क्रिकेटचा सराव करत असत. त्यामुळे चंदू पाटणकर यांना त्यांच्या बालपणीच प्रा. देवधर यांची फलंदाजी अगदी सहजपणे आणि जवळून बघता आली. पुण्यातल्या सुप्रसिद्ध मॉडर्न हायस्कूलमध्ये शिकत असताना ते शाळेच्या क्रिकेट संघाचे कॅप्टन होते. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुण्यातल्याच फर्ग्युसन कॉलेजमध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतला मात्र वर्षभरानंतर ते मुंबईला आपल्या थोरल्या बहिणीकडे हिंदू कॉलनीत राहायला आले. त्याच इमारतीत क्रिकेटपटू माधव मंत्री राहत होते. चंदू पाटणकर यांची बहीण रुईया कॉलेजमध्ये वनस्पती शास्त्राची प्राध्यापक होती आणि मेव्हणे त्याच कॉलेजमध्ये पदार्थविज्ञान विषयाचे प्राध्यापक होते. याच कारणास्तव चंदू पाटणकर यांनी रुईया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांना कॉलेजच्या क्रिकेट संघातून खेळायची संधी मिळत गेली. त्यांना मुंबई विद्यापीठाच्या संघात यष्टिरक्षक म्हणून घेण्यात आले. इंटर - युनिव्हर्सिटी सामन्यांमधली त्यांची कामगिरी पाहून त्यांना मुंबईतर्फे रणजी सामन्यात खेळायची संधी आपोआपच मिळाली. १९५३ पासूनच्या पुढील दहा वर्षात ते दहा रणजी सामने खेळले. त्यातले अखेरचे एक - दोन सामने ते केवळ त्यांचे मित्र चंदू बोर्डे यांच्या आग्रहास्तव, महाराष्ट्र संघाकडून खेळले. चंदू बोर्डे हे त्या काळी महाराष्ट्र संघाचे नेतृत्त्व करत असत. चंदू पाटणकर यांनी १९५४ साली आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होताच मुंबईतल्या बी. ई. एस्. टी. मध्ये तिकीट तपासनीसाची नोकरी स्वीकारली आणि १३ वर्षे ती इमाने इतबारे केली. त्यादरम्यान ते ङ्गटाईम्स शील्डफ साठीचे सामने खेळले. प्रसिद्ध क्रिकेटपटू आणि यशस्वी उद्योजक माधव आपटे यांनी सोलापूर येथील लक्ष्मी विष्णु कॉटन मिल विकत घेतल्यानंतर चंदू पाटणकर यांना १९७० साली त्याच मिलमध्ये जनसंपर्क अधिकारी या पदावरची नोकरी दिली. ही नोकरी करत असताना त्यांनी सामग्री व्यवस्थापनशास्त्र ( मटेरियल्स मॅनेजमेंट ) या विषयाचा अभ्यास केला आणि पुढे त्याच विषयात पुणे विद्यापीठाची ङ्गडॉक्टरेटफ मिळवली. एम्. एस्सी. केल्यानंतर तब्बल ३० वर्षांनी त्यांनी ही उपाधी प्राप्त केली होती. ही उपाधी प्राप्त करणारे ते एकमेव भारतीय कसोटीवीर आहेत. क्रिकेट क्लब ऑफ इंडियाचे तत्कालीन अध्यक्ष राज सिंह डुंगरपूर यांनी सी. सी. आय. च्या सचिवपदी त्यांची नियुक्ती केली त्यामुळे ते उर्वरित काळात क्रिकेट या खेळाशी आणि क्रिकेट खेळाडूंशी कायम निगडित राहिले. त्याशिवाय सेवानिवृत्तीनंतर तहहयात मिळणाऱ्या निवृत्तीवेतनासाठी देखील ते पात्र ठरले. आज त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना मिळत असलेले घसघशीत रकमेचे निवृत्तीवेतन त्यांच्यासाठी जणू वरदानच ठरले आहे. बी. सी. सी. आय. ने एके वर्षी त्यांच्यासाठी ङ्गबेनेफिट मॅचफ घ्यायचे ठरवून त्यांना दहा लाख रुपयांची थैली देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते, परंतु नेमके त्याच सुमारास दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार हॅन्सी क्रोनिए याचे मॅच फिक्सिंग उघडकीस आले आणि क्रिकेट विश्वाला जबरदस्त हादरा बसला. परिणामतः चंदू पाटणकर यांच्यासाठी आयोजित केलेला मदत - सामना रद्द करण्यात आला. त्याऐवजी बी. सी. सी. आय. ने चंदू पाटणकर यांना आधी ठरवलेल्या रक्कमेच्या दामदुप्पट रक्कम देऊन त्यांचा सन्मान केला.

# सुरेश धस सातवी पास, त्याला मंत्री करण्यापेक्षा मला गृहखातं,अर्थखातं द्या;

### विधानपरिषद नको, कॅबिनेट द्या, लक्ष्मण हाकेंची मागणी

सुरेश धसासारख्या सातवी पास माणसाला जर मंत्रिपद देणार असाल तर माझी लायकी आणि ज्ञान पाहून मला मंत्रिपद द्या अशी मागणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली. मला राज्यात गृहखातं, अर्थखातं द्या, नाहीतर केंद्रात मंत्रिपद द्या अशी मागणी लक्ष्मण हाके यांनी केली आहे. राज्यात ओबीसी असलेल्या अर्ध्या लोकांचं मी नेतृत्व करतो, त्याचे प्रश्न सोडवण्यासाठी मला जे माध्यम मिळेल ते घेईन असंही सूचक वक्तव्य त्यांनी केलं. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानतंर तुम्ही विधानपरिषदेवर जाणार का असा प्रश्न विचारल्यानंतर लक्ष्मण हाके म्हणाले, विधानसपरिषद नको, माझी लायकी त्याहून मोठी आहे. मला राज्यात गृहमंत्री, अर्थमंत्री किंवा शिक्षणमंत्री करा. त्या सातवीआठवी पास असलेल्या सुरेश धसला जर तुम्ही मंत्री करणार असाल तर त्यापेक्षा मला करा. माझी लायकी जास्त आहे, ज्ञान जास्त आहे. ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी जे काही करावं लागेल ते मी करणार. लक्ष्मण हाके म्हणाले की, ओबीसींनी त्यांचा प्रभाव दाखवला आहे. निवडणुकीच्या निकालाच्या आगोदरच सांगितलं होता की दुप्पट हरियाणा पॅटर्न असेल. माझ्यामुळे अनेक उमेदवार आले आणि अनेकजण पडले. जरांगे, टोपे, शरद पवार हे हवेत होते, त्यांचा करेक्ट कार्यक्रम केला. राजेश टोपे यांची २५ वर्षांची सत्ता ही २५०० मतांनी घालवली. रोहित पवारांचे कान कापून विजय साजरा केला. आम्ही ९ ठिकाणी उमेदवार घेतली. त्यांनी हजारो मतं घेतली. जरांगेसारखी शेपूट घालून पळून गेलो नाही. इतर ठिकाणी आम्ही महायुतीला पाठिंबा दिला होता असं लक्ष्मण हाके म्हणाले. गेल्या विधानसभेला धनगर समाजाचा एकच आमदार होता, आता सात आमदार झाले आहेत. उत्तम जानकरांना आम्ही निवडून आणलं असंही ते म्हणाले. ज्यांच्या नावाने मतं मागितली, ज्यांचा चेहरा या निवडणुकीत वापरला त्यालाच मुख्यमंत्री करा असं म्हणत लक्ष्मण हाकेंनी नाव न घेता देवेंद्र फडणवीसांच्या नावाला संमती दर्शवली. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने मोठी मुसंडी मारल्याचं दिसून आलं. तर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. महायुतीचा २३६ जागांवर विजय झाला तर महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर यश मिळाले. महायुतीत एकट्या भाजपने १३२ जागा जिंकल्या आहेत


# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज पुण्यतिथी. आजच्याच दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्री पदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. यशवंतराव चव्हाण यांनाभावपूर्ण आदरांजली

# बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी

## शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा सरकारला विसर

सरकारने शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा लाईट (वीज) देण्याचा निर्णय घेतला होता. पण या निर्णयाचा शासनालाच विसर पडला असल्याचे दिसून येत आहे. दिवसा वीज हे केवळ मबोलाचाच भात अन् बोलाचीच कढीफ असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांना दिवसा सलग वीज मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या नशिबी आणखी रात्रीचे जागणे सुरुच आहे. शेतकऱ्यांची मत आणि समर्थन सर्वांनाच हवे असतात. पण त्यांच्या प्रश्नाशी ना सत्ताधाऱ्यांना ना विरोधकांना सोयरसुतक आहे. आजही शेतीसाठी थ्री फेज आठ तासच वीज मिळते, १६ तास भारनियमन आहे. यामुळे पाणी असूनही शेतकऱ्यांना विजे अभावी पिकांना पाणी देता येत नाही. योग्य प्रमाणात अन् योग्य वेळी पिकांना योग्य प्रमाणात पाणी मिळत नाही. यामुळे पिकांची वाढ खुंटते अन् याचा फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसतो. शासकीय कर्मचाऱ्यांना काही अडचण येऊ नये म्हणून शासन निर्णय घेतो व त्यांचे जिवन आणि नोकरी कशी सुकर होईल यासाठी प्रयत्न सुरू असतात. पण रात्री बेरात्री शेतकऱ्यांच्या शेती पंपाला वीज दिली जाते त्यांना पिकांना पाणी देण्यासाठी कोणत्याही क्षणी शेतात जावे लागते. याची मोठी ओरड झाली. यानंतर आम्हीच शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून महायुती शासनाने शेतकऱ्यांना दिवसा लाईट (वीज) देण्याचा निर्णय घेतला, याचा राज्यात जोरदार प्रचार करुन सहानुभूती निर्माण केली. परंतु जसाच पावसाळा संपला आणि शेतकऱ्यांना रब्बी पिकांना पाणी देण्याची गरज पडली तर दिवसा लाईट मिळेना? लाईट असली तरी ती योग्य दाबाने नाही. दाब (व्होल्टेज) कमी असल्याने शेतकऱ्यांचे पाण्याचे पंप ही चालत नाही असे चित्र आहे. यामुळे शेतकरी आता वीज वीकत द्या पण योग्य दाबात द्या म्हणत आहेत. तर एका ३३/ केव्ही केंद्रातून वीज पुरवठा करताना तीन फिडर असले तर शेतकऱ्यांना एका फिडरवर ८ तास वीज देण्यात येते यामुळे एका फिडरवर सकाळी



८ ते दुपारी ४, दुसऱ्या फिडरवर दुपारी ४ ते रात्री १२ अन् तिसऱ्यावर रात्री १२ ते सकाळी ८ अशी वीज मिळत आहे. अन् जिल्ह्यातील बहुतांश ठिकाणी हेच नियोजन महावितरण कंपनीने केले आहे. यामुळे शासनाचा शेतकऱ्यांना दिवसा लाईट (वीज) देण्याचा निर्णय वांझोटा ठरला आहे. तर स्वतःचा निर्णयाचा शासनाला विसर पडला असल्याचे दिसून येत आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्यात आला होता असे दिसून येत असल्याने शेतकऱ्यांना दिवसा लाईट म्हणजे बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी असल्याची चर्चा आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# रूग्णालयाच्या अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीसाठी व एमआरआय, कार्डियाक कॅथलॅब सुविधेसाठी लक्ष्यवेधी शेकोटी आंदोलन:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.२५)बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनिस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे प्रस्ताव ३ वर्षांपासून धुळखात पडुन असुन त्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा

तसेच जिल्हा रुग्णालयात एमआरआय,कार्डिअक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करावी तसेच माता- बालरुग्णालयाची ईमारत वापरात आणावी या विविध आरोग्य विषयक मागण्यांकडे जिल्हा व आरोग्य प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२५ सोमवार रोजी बीड जिल्ह्य रूग्णालय आवारात गेल्यावर्षी डॉ . अशोक बडे,जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनी पाठवलेल्या धुळखात पडलेल्या प्रस्तावाची होळी करून निषेध व्यक्त करण्यासाठी लक्ष्यवेधी ङ्ग शेकोटी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना देण्यात आले. वरिष्ठांना संबंधित प्रकरणात पत्रव्यवहार केल्याचे लेखी डॉ. अशोक थोरात यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,मुबीन शेख , रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक)आदी सहभागी होते.

आहे.रूग्णालयातील इमारतींसाठी अग्निरोधक यंत्रणेसाठी ३३ कोटी ३१ लाख रूपयांच्या निधीची तरतूद करावी बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ ईतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक बसविण्यासाठी जिल्हा रुग्णालय प्रशासनाने शासनाला मार्च २०२२ मध्ये ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे अंदाजपत्रक पाठवत निधी आवश्यक असल्याने निधीची मागणी केली.या घटनेला ३ वर्षे उलटुनही निधी देण्याबाबत शासन स्तरावरून कुठल्याच हालचाली झाल्या नाहीत.तसेच जिल्हा नियोजन आयोगाकडून सुद्धा तरतूद करण्यात आली नाही.त्यामुळे शासन जानेवारी २०२१ मध्ये भंडारा जिल्ह्यातील आणि नोव्हेंबर २०२१मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील रुग्णालयातील आगीच्या घटनेसारखी वाट पहात आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.अग्निरोधक यंत्रणेसाठी संस्थानिहाय लागणारा खर्च (अंदाजे)

१) स्वराती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबेजोगाई १२ कोटी २) जिल्हा रुग्णालय बीड ५ कोटी ३३ लाख३) आष्टी ग्रामीण रुग्णालय १ कोटी ४३ लाख ४) उपजिल्हा रुग्णालय केज ३



कोटी १४ लाख
५) परळी उपजिल्हा रुग्णालय २ कोटी
६) स्त्री रूग्णालय नेकनुर ९५ लाख
७) ग्रामीण रुग्णालय पाटोदा ३७ लाख
८)ट्रामा केअर सेंटर तेलगाव १६ लाख
९) ग्रामीण रुग्णालय नांदुरघाट ९७ लाख
१०) ग्रामीण रुग्णालय धारूर १ कोटी ३९ लाख
११) ग्रामीण रुग्णालय तालखेड ९९ लाख ७० हजार
१२) माजलगाव ग्रामीण रुग्णालय १ कोटी
१३) ग्रामीण रुग्णालय रायमोह १३ लाख ३४ हजार
१४) ग्रामीण रुग्णालय चिंचवण १३ लाख ३४ हजार
१५) ग्रामीण रुग्णालय धानोरा १४ लाख
१६) वृद्धत्व आरोग्य व मानसोपचार केंद्र लोखंडी सावरगाव ४ कोटी ४४ लाख
१७) स्त्री रुग्णालय लोखंडी सावरगाव ७ लाख ३६ हजार
१८) परिचर्या महाविद्यालय लोखंडी सावरगाव ३२ लाख ३४ हजार अशाप्रकारे एकुण ३३ कोटी ३१ लाख रूपयांच्या निधीची आवश्यकता असुन तातडीने त्याची तरतूद करण्यात यावी .

बीड जिल्हा रुग्णालयात एमआरआय सुविधा उपलब्ध करा बीड जिल्हा रुग्णालयाची स्थापना १९५० साली होऊनही रूग्णालयाला आता ७५ वर्षे होऊनही मेंदुतील ताप, शरीरातील धमन्या, अपघातात मेंदू व शरीरांतर्गत तपासणी करण्यासाठी आवश्यक एमआरआय सुविधा उपलब्ध नसुन रूग्णांना खाजगी दवाखान्यात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन रूग्णांना बाहेरून तपासणी करुन आणण्यात ङ्गगोल्डन आवरङ्घ वाया जात असल्याने वेळेवर उपचार होत नाहीत त्यामुळे रूग्ण दगावु शकतो त्यामुळे बीड जिल्हा रुग्णालयात एमआरआय सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. बीड जिल्हा रुग्णालयात कार्डियाक कॅथलॅब सुविधा उपलब्ध करण्यात यावीजिल्ह्याच्या ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब मंजुरीच्या घोषणा अनेकवेळा करण्यात आल्या.३ वर्षांपूर्वी शासनाने निर्णय देखील घेतला मात्र जागा, उपकरणे व तज्ञ यामुळे अद्याप मुहूर्त लागलाच नाही.हृद्यविकाराच्या रूग्णांना वेळेत उपचार मिळणे आवश्यक असते.मात्र कार्डियाक कॅथलॅब नसल्याने रूग्णांना खाजगी रुग्णालयात लाखो रुपये मोजावे लागतात किंवा मृत्युला कवटाळावे लागते त्यामुळे कार्डियाक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करण्यात यावी.

वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर, एमआरआय व कार्डीयाक कॅथलॅब प्रगतीपथावर :- डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड

जिल्हा बीड रूग्णालयासह अधिनस्त आरोग्य संस्थाकरीता अग्निरोधक यंत्रणेसाठी संस्थानिहाय लागणा-या अंदाजित खर्चाबाबत वरीष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे.एमआरआय साठी नविन वाढीव २०० खाटांच्या इमारतीमध्ये जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.तर कार्डियाक कॅथलॅब सुरू करण्यासाठी इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असुन मशीनरी व यंत्रसामग्री प्राप्त झालेल्या असुन काही दिवसातच कार्डियाक कॅथलॅब सुरू करण्यात येणार असल्याचे लेखी डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनी दिले.

# बीडमध्ये हेरीटेज वॉक उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांत व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड आणि श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक वारसा सप्ताह निमित्त दिनांक २३ नोंव्हेंबर २०२४ रोजी बीड येथील कंकालेश्वर मंदीर येथे हेरीटेज वॉकचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पुरातत्व विभाग,छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.कामाजी डक सर यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याचबरोबर इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतच्या महिला विभाग प्रमुख आणि आणि श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय,दहिफळ (वडमाऊली) ता.केज जि.बीड इतिहास विभाग प्रमुख डॉ.शांता जाधवर यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड




इतिहास विभाग प्रमुख डॉ.अनिता शिंदे यांची देखील उपस्थिती होती. यावेळी डॉ.कामाजी डक सर यांनी प्रास्ताविकात सांगितले की, आपला वैभवशाली वारसा सध्या नष्ट होत चालला आहे. तरी या सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नागरीकांनी आणि विद्यार्थ्यांनी हा वारसा ज.पण्यासाठी पुढे आले पाहिजे. आपल्या परिसरातील अस.लेला वैभवशाली ठेवा आपण जपला पाहिजे.मार्गदर्शिका डॉ.शांता जाधवर यांनी विद्यार्थ्यांना कंकालेश्वर मंदीरातील द्वार शाखा, सभामंडप, गर्भगृह,सभामंडपात कोरलेल्या मूर्त्या आणि स्तंभ य.ची विस्तृत माहिती दिली.त्याचबरोबर मंदीरावर असलेले दशावतार, कंकाल, मातृशक्ती आणि इतर मूर्त्यांची माहिती सांगितली. ही माहिती ऐकून अनेक विद्य.र्थ्यांमध्ये कला आणि मूर्तीशास्त्र विषयाची आवड निर्माण झाली. याप्रसंगी इनटॅक छत्रपती संभाजीनगर येथील अमित देशपांडे हेही उपस्थित होते.सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील प्रा.संजय काळे, इतिहास संकलन संस्था देवगिरी प्रांतचे सचिव प्रा.शशिकांत पसारकर यांची यावेळी उपस्थिती होती. सौ.के. एस.के.महाविद्यालयातील एकूण एकवीस विद्यार्थी, विद्यार्थिनी या हेरीटेज वॉकमध्ये सहभाग घेतला. या उपक्रमा बद्दल मह.विद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देंवळाणकर,पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.काकडे,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांनी अभिनंदन केले

# आमची पन्नाशी

वरील पंक्तीत उतरलेल्या शुभेच्छा या सामान्यतः मैत्रीला अनुसरून असतात. या शुभेच्छा देता, घेताना कोण आनंद होतो म्हणू सांगू! अहो वर्षभर इथं शुभेच्छांचे पीक असत. अगदी सण, सोहळे, लग्न, मुंज आणि काहीच नाही तर, नवीन वास्तू वा एखादं प्रेमप्रकरण. या सगळ्यावर खात्रीदायक असलेला रामबाण उपाय ज्याला पर्याय नाही काय.? असा सहज आणि सोपा शुभेच्छारूपी वर्षाव; मनाला तृप्ती दिल्याशिवाय राहात नाही. त्या स्वीकारल्या की मणभर मास अंगभर चढलचं म्हणून समजा! त्यातही वर्षातून एकदाचं येणाऱ्या विशेष दिवसाचे म्हणजे वाढदिवसाचे औचित्य म्हणजे कमाल की ओऽऽऽ कारण एकच आणि ते म्हणजे वय वाढल्याचे हक्काने दाखवून देणारा तो दिवस. म्हणजे बघा वर्षभरातील सुखदुःखाचा जमा-खर्च मांडण्याचा दिवस म्हणजे वाढदिवस. त्यातून आपण काय कमवले, याचा थोडाबहुत विचार करण्याचा दिवस जो, थोडं हसवून, थोडं भावनिक करून जातो. सुखाला कोंदण लावणारा हा दिवस म्हणजे, केशर पेढ्यावर सजलेला वेलदोडा होय. आता हेच पाहा ना, थोडा हुशार, थोडा बावळट असा साधा भोळा मी एक. आदल्या दिवशी आयुष्य मनमुराद जगलो. ऑफिसमधून थेट नाटक पाहायला गेलो. तिथून चौपाटीवर फेरफटका आणि रात्रीच्या जेवणाचा बेत मस्त कुटुंबासमवेत घालवायचा म्हणून लगबगीने चाललेलो. पारिवारिक आनंदाचे क्षण याच्या आधीही अनुभवले होते मी. पण पन्नाशीचा अनुभव खऱ्या अर्थाने हुरहूर लावणारा. वयाने श्रीमंत झाल्याची खुणगाठ पक्की करणारा. मागे वळून पाहाताना अनुभवाची शिदोरी भरून वाहिल्यासारखी, नव्हे ओसंडल्यासारखी वाटत होती. तत्क्षणी डोळे बंद करत हे सत्य वा स्वप्न यातलाही फरक कळेनासा झाला. एवढे भारावलेपण आणि ते ही बाराच्या ठोक्याला. ती ओजस्वी वेळ ओंजळीतल्या फुलाप्रमाणे मूठभर हाताला लागलेल्या आनंदी क्षणांनी मनाला हलकं करणारी. वाढदिवसाच्या आदल्या रात्रीची अनुभवाची पोतडी बहू मोठी वाटते कारण ती जेव्हा वाचून काढतो तेव्हा, वर्षाकाठी साचत जाणाऱ्या यादगार आठवणींची माळ माझ्या देहालगत गुंफण घालते. मी रमतो माझ्या भूत आणि वर्तमानकाळात. मंद चालणाऱ्या घड्याळाचे ठोके १२ वाजताच घणाणतात तेव्हा लगबगीने फोन, मेसेजच्या एकसुरी नादाने, भानावर येतो मी! दीर्घायुषी व्हा. शतायुषी व्हा. ङ्गङ्घमेनी हॅपी रिटर्न्स ऑफ द डेफ्फ, एकाच अर्थाच्या अनेकविध मथळ्यांच्या शुभेच्छांनी रात्री बरोबर आनंदाला नशा चढते. या नशेत असणाऱ्या प्रत्येकाबरोबर माझा मित्र शिरीष असतो. मी त्याची आठवण काढतो. फोन लावतो. दोन-चार शिव्या घालतो आणि त्याचेही अभिनंदन करतो. वर्गमित्र ते फॅमिली फ्रेंड प्रवासातले आमचे नाते अगदी घट्ट. आमची जन्मतारीख ही एकच, त्यामुळे वयही सारखेच. नाहीतर एवढा कुठला योगायोग असणार हो! पण एकाला लागले तर दुसऱ्याला त्रास व्हावा एवढी लंगोटी मैत्री आमची. सांगायचे झाल तर त्या काळची आमची परिस्थिती बेताचीचं होती. एक वेळच्या अन्नात दोन वेळच्या अन्नाचे कसब पणाला लावत, काम उरकण्याची हातोटी आमच्या आईची. बाबांच्या नोकरीतून वर्षाकाठी दोनदा नवे कपड्यांचे जोड अंगावर पडत. दिवाळीच्या फराळा व्यतिरिक्त पाडव्याच्या गोड जेवणावर धन्यता मानणारे आम्ही, मित्राच्या श्रीमंतीला कधी बुजलो नाही. तसे शिरीषनेही आमच्या नात्यात श्रीमंती पुजली नाही. दंगा मस्तीत नंबर वन असलेलो आम्ही टवाळ पोरं शाळेबरोबर क्रमाने कॉलेजची पायरी हातात हात घालून चढलो. नोकरी दरम्यान शिरीषला परगावी जावे लागले आणि ते निमित्त ठरले. डाव खेळली होती नियती. म्हणजे एका ठिकाणी ब्लड डोनेशनची पाटी वाचून त्याच्यातल्या परोपकाराच्या जाणिवेने त्याला स्वस्थ बसू दिले नव्हते. पुढे रक्तदान जोशात झाले पण त्यानंतरचा जोश मावळल्यागत होता. दानासारख्या सेवा व्रताने चिंता निर्माण झाली. चित्र बदलले. शिरीषची तब्येत बिघडू लागली. त्यास्तव उपचाराला जोर येत नव्हता. रोगप्रतिकारशक्ती कमी झाली. शेवट एचआयवीचे निदान झाले आणि एक छोटीशी मदत मित्राच्या आयुष्यावर काळी रेघोटी मारून गेली होती. शिरीष संपला होता. संकट समोर उभे होते. ङ्गङ्घपावलापुरती वाट दिसली तरी, ती मला पुरेशी आहे जगण्याला सामोरे जातानाफ्फ महात्मा गांधीजींच्या या वाक्याची सहजता मित्राच्या जगण्याला आली होती. संयम ठेवत, घरच्यांना धीर देत, त्याच्या उभं राहण्याच्या धाडसी निर्णयाला आम्ही सलाम ठोकला.

# निवडणूका संपल्या आता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा

शिरूर । प्रतिनिधी लोकशाहीचा उत्सव म्हणत विधानसभा निवडणूका पार पडल्या आसल्या तरी या प्रचारातून बळीराजा कोसो दुर राहीला. जाती-धर्माच्या आधारावरील निवडणूकीतून बहुसंख्य पण दुर्लक्षीत समाजाच्या अनेक समस्या कायमची आहेत.खरीप हंगामातील अतिवृष्टीने बहुतेक मतदार संघातील शेतक-यांच्या पीकांची नुकसान भरपाई ,जाहीर केलेले अनुदाने तसेच पीक विमा कंपनीने विमाधारक क्षेत्राची केवळ सर्वेक्षणे करून तशीच पडून आहेत.त्यांच्याकडील कार्यवाही करणे यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष घातले आवश्यक आहे.सद्यस्थितीत शेतमालाची कवडीमोल भावाने शेतक-यांना विक्री करावी लागत आहे.कपाशी उत्पादक क्षेत्रातील कृषि उत्पन्न बाजार समिती तर मूग गीळून गप्प आहेत.खाजगी शेतमाल खरेदी केंद्रांवर कोणतेच नियंत्रण नसल्याने शेतक-यांची विविध मार्गाने होणारी लूट थांबवणे आवश्यक आहे. शेतक-यांचे महाराष्ट ग्रामीण बँका व इतर बँका कडील पीककर्जे या संबधातील अनेक समस्या आहेत.तूर पीकांवरील अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे या बाबतीत कृषीविभाकडुन मार्गदर्शन व किटकनाशके उपलब्ध होणे आवश्यक आहे. रब्बी हंगामातील पीकांना पाणी देण्यासाठी विद्यतविभाकडून अपूरा वीजपूरवठा लोडशेडींग



मुळे शेतकरी त्रस्त आहेत.अनेक भागातील शेतक-यांसाठी नवीन ट्रान्सफॉर्मर ची मागणी व आवश्यकता असुन देखील लोकप्रतिनिधी या मागणीची दखल घेत नाहीत. शेतमालाची नासाडी रोखण्यासाठी शेतक-यांना सौरकुंपन अथवा काटेरी कुंपणाची नाविण्यपूर्ण योजना अद्यापही कार्यान्वीत झाली नाही.त्यामुळे बीड जिल्यातील भूईमुग,मका,या सारखी उत्पादने डुकराच्या त्रासामुळे नामशेष होत आहेत.शेतक-यांच्या शेतरस्ते नसणे त्यांच्यावरील अतिक्रमणे,अनेक शेततरहते रेकॉर्डवर नसल्याने शेतमाल वाहतुक करण्यातील समस्या आहेत तसेच नदी नाल्यावरील पूल उभारणे आवश्यक आहेत.रासायनिक खतांच्या वापराने विविध आजार व शेती नापीक होण्याचा धोका वाढल्याने सेंद्रीय शेती धोरण राबविण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.त्यासाठी पशुधन जतन करून त्यांच्या शेणखत व इतर सेंद्रिय खते,गांडूळ खत, नाडेप कंपोस्ट खते निर्मीतीसाठी प्रशिक्षण करणे, त्यासाठीच्या योजना प्रभावी राबवणे,



गोवर्धन गोवंशाची जतन करण्यातील अडचणी, अशा शेतकरी समाजाच्या प्रमुख समस्या आहेत.वेळोवेळी शेतकरी मागणी,निवेदने,आंदोलने करत आसले तरी लोकप्रतिनिधी सोईस्कर डोळेझाक झाल्याने या समस्या अद्यापही आहेत. अशा विविध शेतकरी समस्यांवर शिवश्री कृषि मंडळ यांच्या बैठकित चर्चा करून पुढील काळात या समस्या सोडवण्यासाठीच प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष शिवराम राऊत व सर्व पदाधिकारी सदस्य शेतकरी यांनी निश्चित केले आहे

# महायुतीच्या अभूतपूर्व विजयाचा अनिलदादा जगताप यांच्याकडून जल्लोष साजरा!

## एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी शिवसैनिकांकडून साकडे

बीड, प्रतिनिधी- नुकत्याचा पार पडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयी यशाबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गर्शनाखाली बीडमध्ये शिवसैनिकांनी महायुतीचे अभिनंदन करत मोठ्या हर्षल्हासात आनंद सोहळा साजरा केला तसेच हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर मा. आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्रभरात सर्व सामान्यांसाठी कल्याणकारी योजना राबवत यशाची पताका फडकावणारे शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी बीड शहरातील सोमेश्वर महादेव मंदिरात भावीक भक्तांच्या उपस्थितीत सामूहिक आरती करून जिल्हाप्रमुख




अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी साकडे देखील घातले. काल सोमवारी दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी एकत्रित येऊन महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फाटक्यांची आतषबाजी करत शिवसेनेचा जयघोष केला तसेच सर्वांनी मिठाई वाटून आनंदत्सव साजरा केला. मा.मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व लाडके शिवसैनिक यांच्या कष्टातून विधानसभा निवडणुकीत आपणांस भरघोस यश मिळाले असल्याच्या भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या. या निमित्ताने सायंकाळच्या दरम्यान शिवसैनिक तथा महिला भगिनींनी पणती व दिवे प्रज्वलीत केले तसेच विविध मंदिरात देखील शिवसैनिकांनी देवी देवतांच्या चरणी नतमस्तक होऊन आरत्या केल्या व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शाम भाऊ पडूळे, शिवसेना जेष्ठ नेते सुरेश तात्या शेटे, महिला आघाडी जिल्हा सहसंपर्कप्रमुख डावकर ताई, शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शिवसेना विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, शिवसेना तालुका संघटक गणेश मस्के, सुदर्शनजी धांडे, सुनील गवते, गजानन कदम, शिवसेना शहर संघटक नवनाथ शिंदे, शिवसेना शहर सह संघटक ऋषिकेश जोगदंड, शिवसेना उप शहर प्रमुख हनुमानप्रसाद पांडे, शिवसेना उपशहर प्रमुख अक्षय काशीद, माजी सरपंच संदीपान बडगे, शिवसेना विभाग प्रमुख सदाशिव सुर्वे , शिवसेना विभाग प्रमुख शहर रणजीत बुंदिले, सरपंच अंकुश गायकवाड,अमोल मामा जाधव, उत्कर्ष धपाटे, गणेश काळे, अनिल खांडे, अविनाश पाटोळे,तुकाराम गोरे, गणेश डांगे, राहुल कोकाटे, अजय सुरवसे, प्रताप जगताप, गणेश काळे व आदी उपस्थित होते.

### महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबच असावेत- अनिलदादा जगताप

तळागाळातील माणसांची जान असणारे सर्व सामान्यांचे नेतृत्व म्हणून अवघ्या महाराष्ट्रभरातील जेष्ठ, तरुणाई, शेतकरी, कष्टकरी, महिला भगिनी यांच्यात आमचा सक्षम आधार अशी विश्वास निर्माण करणारे शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश प्राप्त केले असून आता शिंदे साहेबच महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी सर्वोपरी योग्य चेहरा आहे व शिंदे साहेबच पुन्हा मुख्यमंत्री बनावेत अशी भावना शिवसैनिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे व राज्याच्या विकासाठी शिंदे साहेबांच्याच हातात मुख्यमंत्री पदाची धुरा द्यावी अशी एक शिवसैनिक म्हणून महायुतीच्या जेष्ठ श्रेष्ठींना विनंती आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आपली भावना व्यक्त केली.

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# जल प्रकल्पातील पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे - विभागीय आयुक्त दिलीप गावडे

## कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरले रब्बी- उन्हाळी पाण्याचे नियोजन



छत्रपती संभाजीनगर, दि.२५ : छत्रपती संभाजीनगर विभागातील प्रकल्पातील पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त तथा कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष दिलीप गावडे यांच्या अध्यक्षतेखाली जायकवाडी प्रकल्प, नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्प, निम्न दुधना प्रकल्प, माजलगाव प्रकल्प, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प, पूर्णा प्रकल्प (येलदरी व सिद्धेश्वर प्रकल्प), मांजरा प्रकल्प, निम्न तेरणा प्रकल्प, सिना कोळेगाव प्रकल्प या नऊ मोठया प्रकल्पावरील सिंचन तसेच पाणी नियोजनासाठी कालवा सल्लागार समितीची (शासकीय सदस्यांची) बैठक आज विभागीय आयुक्त कार्यालयात झाली. यावेळी दूरदृष्य प्रणालीव्दारे सबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच सबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकस्थळी मुख्य अभियंता लाभक्षेत्र तथा सदस्य जयंत गवळी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा) चे अधीक्षक अभियंता सं. को. सब्बीनवार, अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, पल्लवी जगताप, महसूल उपायुक्त नयना बोंदर्डे, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.१ चे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, नांदूर मधमेश्वर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राकेश गुजरे, जायकवाडी पाटबंधारे विभाग जालनाचे कार्यकारी अभियंता सुरेखा कोरके, लाभक्षेत्र पाटबंधारे विभाग क्र.-१ लातूरचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, धाराशिव पाटबंधारे विभाग क्र-१ चे कार्यकारी अभियंता अ.ना.मदने, उपस्थित होते.यावेळी विभागीय आयुक्त श्री गावडे म्हणाले, पाऊस चांगला झाल्याने आपल्या विभागातील बहुतांश प्रकल्पात चांगला पाणीसाठा आहे. त्यामुळे या पाण्याचे पिण्यासाठी, शेतीसाठी तसेच उद्योगासाठी सूक्ष्म नियोजन करावे. पाणीटंचाई भासणार नाही तसेच टँकरची गरज पडू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केंली. जलसंपदा विभागासह जिल्हा प्रशासनाने सूक्ष्म पाणी नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता सं. को. सब्बीनवार, अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, पल्लवी जगताप तसेच प्रणालीव्दारे नांदेडचे अधीक्षक अभियंता अजय दाभाडे यांनी प्रकल्पातील सद्यस्थिती व नियोजनाबाबत माहिती दिली. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत सिंचन प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यात आले असून संबंधीत जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्या यानंतर यानंतर होणा-या बैठकीत अंतिम निर्णय करण्यात येणार असल्याचेही ठरले.

### जायकवाडी प्रकल्पातून आज रब्बीचे पहिले आवर्तन

जायकवाडी धरणामध्ये २१७१.०० दलघमी (१००.००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. जायकवाडी डाव्या कालव्याचे रब्बीचे पहिले आवर्तन आज २५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सोडण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, अहिल्यानगर, बीड व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना याचा लाभ होणार आहे.

### नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्प: रब्बी हंगामातील दोन पाणी आवर्तने डिसेंबरअखेर

नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाशिक जिल्ह्यातील मुकणे, भाम, भावली व वाकी या चार धरणामध्ये ३०३.३८ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. नांदूर मधमेश्वर कालवा मुखाशी सिंचनासाठी उपलब्ध पाणीसाठयावर रब्बी हंगामात दोन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित केलेले असून सदर आवर्तने अनुक्रमे डिसेंबर अखेर व फेब्रुवारी महिन्यात गोदावरी डावा व उजवा कालवा समवेत घेणे प्रस्तावित आहे. छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना याचा लाभ होणार आहे. उन्हाळी हंगामातील आवर्तनाबाबत निर्णय पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली होण-या कालवा सल्लागार बैठकीत घेण्यात येणार आहे.

### निम्न तेरणा प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार

या वर्षी दोन्ही धरणामध्ये ९१.२२१ दलघमी (१००.%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व पाच पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. लातूर व धाराशिव या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना याचा लाभ होणार आहे.

### निम्न दुधना प्रकल्प: रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन पाणी आवर्तन प्रस्तावित

निम्न दुधना प्रकल्पामध्ये १८१.७८० दलघमी (७५%) उपयुक्त पाणीसाठा झालेला असून धरणावर अवलंबून असलेल्या सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित केले आहे. कालव्याचे रब्बीचे पहिले आवर्तन २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. जालना व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना याचा लाभ होणार आहे.

### माजलगाव प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार

या वर्षी धरणामध्ये २६३.२० दलघमी (८४.३५%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. याचा लाभ बीड व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना होणार आहे.

### ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प: रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन प्रस्तावित

ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पामध्ये ९६४.१० दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. याचा लाभ यवतमाळ, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना होणार आहे.

### पूर्णा प्रकल्प (येलदरी व सिद्धेश्वर धरण) : रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे चार व चार पाणी आवर्तन

पूर्णा प्रकल्पामध्ये ८९०.७३ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे चार व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन आज २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. परभणी, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना याचा लाभ होणार आहे.

### मांजरा प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन २० डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार

मांजरा धरणामध्ये १७६.९६३ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे ०२ व ०३ पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन २० डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. लातूर, बीड व धाराशिव या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना लाभ होणार आहे.

### सिना कोळेगाव प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन १ डिसेंबर २०२४ रोजी

सिना कोळेगाव धरणामध्ये ८९.३४ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी हंगामात दोन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. धाराशिव व सोलापूर या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतक-यांना याचा लाभ होणार आहे.बैठकीला गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, जलसंपदा विभाग छत्रपती संभाजीनगर, संबंधीत जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, प्रकल्पाशी संबंधित अधीक्षक अभियंता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्पाशी संबंधित कार्यकारी अभियंता, कृषी कार्यालयाचे जिल्हा कृषी अधीक्षक आणि महानगरपालिका व नगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com